पुण्य नगरी

मंगळवार, १४ जुलै २०२६

# विवेकानंद महाविद्यालयात रिल मेकिंग स्पर्धा

**कोल्हापूर :** जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त विवेकानंद महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभाग आणि शिवाजी युनिव्हर्सिटी इकॉनॉमिक्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने रिल मेकिंग स्पर्धा घेण्यात आली. लोकसंख्या, शाश्वत विकास आणि जनजागृती या विषयांवर विद्यार्थ्यांनी सर्जनशील रिल्स सादर करून स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. स्पर्धेत संजना पाटील हिने प्रथम, समृद्धी चौगुले द्वितीय, तर ऋषी प्रसाद आणि अदिती असवले यांनी संयुक्त तृतीय, तर अभिषेक जाधव याने चतुर्थ क्रमांक मिळविला. स्पर्धेचे परीक्षण डॉ. विजय मस्के आणि डॉ. किरण सकट यांनी केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. कैलास पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संपदा टिपकुर्ले उपस्थित होत्या. यावेळी प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, प्रा. ए. बी. वसेकर, साक्षी क्षीरसागर, प्रा. नयना पाटील आदी उपस्थित होते.